# २० व्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारक

## घटक ३ : सामाजिक राजकीय सुधारक

### २) प्रबोधनकार ठाकरे

प्रस्तावना

एक विलक्षण मनस्वी लढाऊ बहुआयामी व्यक्तिमत्व आणि धडाडीचे कळते सुधारक म्हणूनच केशव सिताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे महाराष्ट्राला परिचित आहेत. सामाजिक आणि धार्मिक गुलामगिरीचा नायनाट करण्यासाठी त्यांनी प्रवर्तित केलेल्या प्रबोधन या नियतकालिकाने मराठी जनमानसावर प्रगाढ ठसा ऊमटविल्यामुळेच प्रबोधनकार हे बिरूद केशव सिताराम ठाकरे यांना प्राप्त झाले. आणि यथावकाश ते जणू व्यक्ती मानच बनले. सडेतोड प्रतिपादन शैली ज्वलजहाल शब्दयोजना ही प्रबोधनकारांच्या लेखन शैलीची वैशिष्ट्ये आहेत. अस्पृश्यता निवारण हुंडाबंदी बाल जरठ विवाह यांसारख्या सामाजिक प्रश्नाबाबत प्रबोधनकारांनी पोटतीडकीने वाणी व लेखणी चालविली. ब्राह्मणे तर चळवळ तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत प्रबोधनकार अग्रेसर होते. इतिहास लेखन, नाट्यलेखन, पत्रकारिता अशा बहुविध क्षेत्रात प्रबोधनकारांनी आपल्या लेखणीचा ठसा उमटविला. समाजसुधारक, व्यंगचित्रकार, छायाचित्रकार, उत्तम वक्ते, जाहिरात क्षेत्र तसेच नाट्य क्षेत्रात कामगिरी असे प्रबोधनकारांचे व्यक्तिमत्व बहुआयामी होते त्यांनी केलेले समाजसुधारणातील कार्य पुढील प्रमाणे पाहता येईल

जन्म व बालपण शिक्षण

ठाकरे घराणे मूळचे पाली गावचे प्रबोधनकारांचे पूर्वज पेशवाईत घोडप किल्ल्याचे किल्लेदार होते. म्हणून त्यांचे आडनाव घोडपकर झाले पुढे इंग्रजांचे राज्य आल्यावर किल्लेदारी गेली प्रबोधनकारांचे पूर्वज आजच्या ठाणे शहर न्यायालयात डिस्ट्रिक्ट प्लिडरचे काम करू लागले. त्यांचे आजोबा रामचंद्र हे वृत्तीने धार्मिक होते अशा या घराण्यात 17 सप्टेंबर 1885 रोजी प्रबोधनकार ठाकरे उर्फ सीता होते पण त्यांना सगळे बय म्हणतं. प्रबोधनकारांचे वडील सिताराम ठाकरे हे पनवेलच्या स्मॉल कॉज कोर्टात बेलीफ होते ते अभिनेते, तबला वादक, स्टेजइंजिनियर, मूर्तिकाम, सुतार काम, लोहार काम व रंगकाम अक्षय क्षेत्रात स्वतःचा ठसा राखून होते. प्रबोधनकारांचे शालेय शिक्षण पनवेलच्या मराठी शाळेत झाले. पुढे त्यांना इतिहास आणि इंग्रजी

विषयाची गोडी लागली. नंतर ते सध्याच्या मध्य प्रदेशातील देवास भागातील विक्टोरिया हायस्कूल मीडल क्लास येथे शिकण्यात गेले. नंतर ते मुंबईत आले आणि अडचणींवर मात करून त्यांनी शिक्षण घेतले. वयाच्या नव्या वर्षी ह. ना. आते संपादित करमणूक पत्रातून छत्रीची उत्पत्ती या विषयावर त्यांनी एक टिपण लिहिले. लेखन आणि भाषण व मतपत्र या माध्यमातून त्यांनी जनतेचे प्रबोधन केल्यामुळे त्यांना पुढे प्रबोधनकार पदवी मिळाली. या कार्यासाठी त्यांनी महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर लोकहितवादी उर्फ गोपाळ हरी देशमुख यांना स्फूर्ती स्थान मांडले.

सामाजिक कार्य सुरुवात

१९११ मध्ये डॉक्टर भालचंद्र भाटवडेकर यांच्या नेतृत्वाखाली न्यायमूर्ती चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रबोधनकारांनी सोशल सर्विस लीग ची स्थापना केली. सुरुवातीला फक्त कष्टकरी कामगार आणि शेतकरी यांच्या हितासाठी धडपड करण्याचे ठरले. गरीब आणि श्रमजीवी लोकांच्या संदर्भात केशवराव लिहितात-"पोटाच्या पापाने निर्माण केलेल्या श्रीमंत आणि गरीब या भेदाने जगतात आजपर्यंत जितके अत्याचार केलेले आहेत तितके महायुद्धांनी राज्यकर्त्यांनी किंवा ठगांच्या दरोड्यांनी केलेले नाहीत."या लीपच्या माध्यमातून सर्वसामान्यांसाठी मोफत फिरते ग्रंथालय, रात्रीचे मोफत शिक्षणाचे वर्ग, गरीब विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके व आर्थिक मदत, हॉस्पिटलमध्ये रुग्णांना वाचण्यासाठी मासिके ग्रंथ पोहोचविणे, समाजसुधारणा विषयावर तज्ञांची व्याख्याने आयोजित करणे, अपघात प्रसंगी सर्व प्रकारची मदत करणे, रोगांची सुश्रुषा करणे, बाल संगोपन वर्ग चालविणे, व्यायाम व योगासन वर्ग चालविणे, पतपेढ्या उभारणे व त्या माध्यमातून आर्थिक प्रश्न सोडविणे इत्यादी कामे सुरू झाली.

प्रबोधनकारांचे समाज सुधारणेतील योगदान :

प्रबोधनकार ठाकरे यांचे शैक्षणिक विचार, स्वाभिमान आणि समाजपरिवर्तनाचे प्रभावी शस्त्र

प्रबोधनकार ठाकरे यांच्या मते शिक्षण हे केवळ पदव्या मिळवण्याचे साधन नसून ते प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याचे आणि माणसाला स्वाभिमानी बनवणारे प्रभावी शस्त्र आहे. ब्रिटीश काळात शिक्षणावर विशिष्ट वर्गाची मक्तेदारी होती, ज्यामुळे बहुजन समाज आणि स्त्री वर्ग अंधश्रद्धा व कर्मकांडाच्या अंधारात अडकला होता. महात्मा फुलेंच्या विचारांचा वारसा पुढे

चालवत प्रबोधनकारांनी स्पष्ट केले की, ज्या शिक्षणामुळे माणसाच्या मनात गरिबांविषयी दयाभाव निर्माण होत नाही किंवा जे शौर्य आणि धैर्याचा विकास करत नाही, ते खरे शिक्षणच नव्हे. त्यांनी स्वतः अत्यंत गरिबीत आणि संघर्षात शिक्षण घेतले, परंतु कधीही लाचारी पत्करली नाही. उलट, प्रतिकूल परिस्थितीला हंटरचे तडाखे देऊन आपल्या ध्येयाकडे वाटचाल करणाराच खरा मर्द आणि वीर असतो, असे त्यांचे ठाम मत होते.

खऱ्या शिक्षणाचे ध्येय हे शोषित आणि कनिष्ठ स्तरातील लोकांना त्यांच्या मानवी हक्कांची जाणीव करून देणे हे असायला हवे. प्रबोधनकारांनी मानसिक गुलामगिरीला 'मनाचा मृत्यू' मानले आणि ही गुलामगिरी नष्ट करण्यासाठी समाजात चिकित्सक दृष्टी निर्माण करण्यावर भर दिला. त्यांच्या मते, "का? का?" हा प्रश्न विचारण्याची हिंमत असणे हाच खऱ्या माणुसकीचा पुरावा आहे, तर "वा! वा!" म्हणणे ही गुलामगिरीची लक्षणे आहेत. आजचा शिकलेला वर्ग जर केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी बुद्धीचा लिलाव करत असेल, तर ते शिक्षणाचे अपयश आहे. स्वाभिमान हा मानवी जीवनाचा प्राण असून, माणसाने स्वतःच्या विवेकबुद्धीची समशेर पाजळून अन्यायाविरुद्ध उभे राहिले पाहिजे, तरच समाजाचा आणि राष्ट्राचा सर्वांगीण उत्कर्ष शक्य आहे, हाच त्यांच्या शैक्षणिक विचारांचा गाभा आहे.

प्रबोधनकार ठाकरे यांचे स्त्री विषयक विचार आणि सामाजिक स्थिती

पेशवाईच्या अस्तानंतर महाराष्ट्रात ब्रिटीश राजवटीचे स्वागत झाले, कारण तत्कालीन राज्यकर्त्यांच्या काळात स्त्रियांना अमानुष छळ आणि पाशवी अत्याचारांना सामोरे जावे लागत होते. पेशवाईत स्त्रियांची अवस्था इतकी भयावह होती की, बाजीरावाच्या दहशतीमुळे अनेक महिलांनी विहिरीत उड्या टाकून आपले प्राण दिले होते. ब्रिटीश राजवटीत शिक्षणाचे वारे वाहू लागल्यानंतर लोकहितवादींसारख्या विचारवंतांनी सती प्रथा, बालहत्या आणि विधवांच्या छळावर कडक टीका करत नवीन राजवटीचे समर्थन केले. स्त्रियांच्या स्थितीतील हा दयनीयपणा दूर करण्यासाठी महात्मा जोतीराव फुले यांनी १८४८ मध्ये पहिली मुलींची शाळा सुरू केली आणि समाजसुधारणेचा पाया रचला. समाजात सतीची प्रथा धर्माच्या नावाखाली सुरू होती, जिला राजा राममोहन रॉय यांच्या प्रयत्नांमुळे १८२९ मध्ये कायद्याने बंदी घालण्यात आली. याशिवाय, विधवांना पुनर्विवाहास बंदी होती आणि त्यांना सक्तीने 'केशवपन' करावे लागत असे, ज्याविरुद्ध सावित्रीबाई फुलेंनी न्हाव्यांचा संप घडवून आणला होता. बालविवाहाच्या प्रथेमुळे अनेक मुली

लहान वयातच विधवा होत आणि समाजात त्यांचे जगणे असह्य होत असे, ज्यासाठी महात्मा फुलेंनी 'बालहत्या प्रतिबंधक गृह' स्थापन केले. प्रबोधनकार ठाकरे यांनी महात्मा फुलेंचा वारसा पुढे नेत स्त्री-पुरुष समानतेचा प्रखर पुरस्कार केला. त्यांनी आपल्या 'संगीत विधिनिषेध' या नाटकातून स्त्रियांना त्यांच्या मानवी हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा दिली आणि पुरुषप्रधान संस्कृतीतील पक्षपातीपणावर कडक ताशेरे ओढले. प्रबोधनकारांच्या मते, स्त्री ही अबला नसून ती 'सबला' आहे आणि तिने केलेल्या असामान्य त्यागामुळेच ती पुरुषांपेक्षा श्रेष्ठ ठरते. त्यांनी आईच्या प्रेमाचे वर्णन करताना 'आई' या दोन अक्षरांत संपूर्ण विश्व सामावलेले असल्याचे सांगितले. हिरकणीच्या मातृप्रेमाचा आदर्श समोर ठेवून त्यांनी आपल्या घराचे नावही 'मातोश्री' ठेवले होते. आनंदीबाई जोशी, पंडिता रमाबाई आणि सरोजिनी नायडू यांच्यासारख्या स्त्रियांच्या कर्तृत्वाचा गौरव करत त्यांनी स्त्रियांना समाजात मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले.

हुंडा विध्वंसक संघ-प्रबोधनकारांनी गाजवलेली सुरुवातीची सर्वात महत्त्वाची मोहीम म्हणजे हुंडाबिध्वंसक संघ होय हुंडा देणारी आणि घेणाऱ्या लोकांच्या लग्न मंडपावर प्रबोधनकार्याने 1922 ते 23 या काळात मोर्चे काढले. यासाठी प्रबोधनकारांनी एक दल उभारले. संघटनेचा विशिष्ट पेहराव टोप्या, काळा कापडाची पट्टी त्यावर हुंडा विद्वंसक असे लिहिलेले, बदामाच्या आकाराचे हुंडा विध्वंसक पदक असा पोशाख करणारे तरुण कार्यरत झाले. कोणाच्याही घरी लग्न झाले की हे कार्यकर्ते त्यांच्या घरी जाऊन हुंड्याची चौकशी करू लागले. हुंडा घेतला असल्यास तो परत करावा लागे. हुंडा घेणाऱ्या वरचे प्रतीक म्हणून संघटनेने गाढव सजवलेले होते. गाढवाच्या पाठीवर कार्डबोर्ड रंगवलेले असायचे. मिरवणुकीत कार्यकर्ते निषेधाचे बोर्ड घेऊन गाढवाच्या मागे चालत असत. मिरवणूक सुरू झाली की स्त्रिया गाढवाला पंचारतीने ओवाळत याचा समाजावर चांगला परिणाम झाला.

समारोप

प्रबोधनकारांच्या सगळ्याच क्रांतिकारी विचारांमधून माझी अशी ठाम समजूत झालेली आहे की, त्यांचे विवार म्हणजे महाराष्ट्राचाच नव्हे तर भारताचा आरसा होय. चेहऱ्यावर पडलेले डाग आपण आरशामध्ये पाहून पुसून टाकतो, त्याप्रमाणे हृदयावर आणि मानवी मनावर पडलेले डाग इतिहास रूपी आरशामध्ये पाहूनच पुसून टाकावे लागतात. आजही आपल्या समाजात विषमता,

अज्ञान, अंधश्रद्धा, हुंडापद्धती, हुंडाबळी, देवधर्म, पुराणांचे दास्यत्व, श्राद्धादी कर्मकांडे तसेच सत्यनारायण व महाआरत्यांचे भाजलेले स्तोम असे हजारो प्रश्न आहेत. ज्यामध्ये भोळ्या भाबड्या लोकांच्या जीवनाची राखरांगोळी झालेली आहे. या सर्व प्रश्नांच्या विरोधी बंड पुकारून प्रबोधनकारांनी बुद्धिप्रामाण्यवादाची कास धरून समाजाला सदृढ आणि निरोगी बनविण्याचा अव्याहतपणे प्रयत्न केला. त्यामुळे आजच्या परिस्थितीत आपणाला प्रबोधनकारांच्याच मार्गाने वाटचाल करावी लागणार आहे ही वस्तुस्थिती कोणालाही नाकारता येणार नाही.